पंतप्रधानांचा बिश्केक, किर्गिझ येथे 26 व्या SCO शिखर परिषदेत सहभाग (01 सप्टेंबर 2026)

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी, आज बिश्केक किर्गिझ येथे 31 ऑगस्ट ते 01 सप्टेंबर 2026 दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या शांघाय सहकार्य संघटनेच्या (SCO) राष्ट्रप्रमुखांच्या परिषदेच्या 26 व्या बैठकीत सहभागी झाले.

2.यावर्षी SCO ला 25 वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने नेत्यांनी SCO च्या प्रगतीचा आढावा घेतला तसेच या प्रदेशातील शांतता, सुरक्षा, स्थैर्य आणि समृद्धीसाठी SCO ची भूमिका अधिक बळकट करण्याबाबत विचारविनिमय केला.

3. पंतप्रधानांनी आपल्या संबोधनाची सुरुवात किर्गिझचे राष्ट्रपती माननीय श्री. सादिर झापारोव्ह यांच्या स्नेहपूर्ण स्वागत आणि आदरातिथ्याबद्दल आभार मानून केली. SCO च्या 25 व्या वर्षी आयोजित ही शिखर परिषद SCO ने विकसित केलेल्या संवाद आणि सहकार्याच्या भक्कम परंपरेच्या आधारावर पुढील 25 वर्षांसाठीचा आराखडा तयार करण्यासाठी योग्य वेळ असल्याचे त्यांनी नमूद केले. मागील शिखर परिषदेत भारताने सुरक्षा, संपर्क आणि संधी या तीन बाबींविषयी आपला दृष्टीकोन मांडला होता आणि आता या तीन सामायिक कार्य-स्तंभांमध्ये ठोस परिणाम साध्य करण्यासाठी समूहाने काम केले पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. संघर्षांचे निराकरण रणांगणावर होऊ शकत नाही आणि संवाद व राजनय हाच पुढे जाण्याचा एकमेव मार्ग आहे, या भारताच्या भूमिकेचा त्यांनी पुनरुच्चार केला. दहशतवाद हा मानवतेसमोरील गंभीर धोका असल्याचे अधोरेखित करत, त्यांनी दहशतवादी परिसंस्था नष्ट करण्यासाठी ठोस आणि वचनबद्ध कारवाई करण्याचे आवाहन केले. दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात कोणत्याही प्रकारची दुहेरी भूमिका असू नये, यावर त्यांनी विशेष भर दिला. युरेशिया प्रदेशातील सुरक्षा ही अफगाणिस्तानातील शांतता आणि स्थैर्य याच्याशी निकटपणे जोडलेली असल्याचे नमूद करून, त्यांनी भारताकडून त्या देशासाठी देण्यात येणाऱ्या विकासविषयक आणि मानवतावादी मदतीचा उल्लेख केला.

4. पंतप्रधानांनी पुढे नमूद केले की, समूहाच्या सामायिक प्रगती आणि समृद्धीसाठी मजबूत आणि विश्वासार्ह संपर्क उपक्रम महत्त्वाचे आहेत. बाजारपेठांना परस्परांशी जोडणाऱ्या, व्यापाराला चालना देणाऱ्या आणि विकासाच्या नव्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या संपर्क प्रयत्नांना भारताचा पाठिंबा असल्याचे अधोरेखित करत, अशा प्रयत्नांमध्ये राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर केला गेला पाहिजे, याचा त्यांनी पुनरुच्चार केला. तंत्रज्ञान, उद्योजकता, नवोपक्रम, स्टार्ट-अप्स आणि लोकांमधील परस्पर संपर्काच्या उपक्रमांमुळे SCO सदस्य देशांतील जनतेसाठी मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होतात, असे त्यांनी पुढे नमूद केले. या संदर्भात त्यांनी किरगिस्तानच्या अध्यक्षतेखाली युवा सहभागावर लक्ष केंद्रित केल्याबद्दल त्यांनी कौतुक केले. या वर्षाच्या अखेरीस SCO सिव्हिलायझेशन डायलॉग फोरमची पहिली आवृत्तीचे यजमानपद भूषविण्यास भारताला आनंद होईल, असे पंतप्रधानांनी अधोरेखित केले. सदस्य राष्ट्रांमध्ये संस्कृतींमधील देवाणघेवाण वाढविण्याच्या उद्देशाने भारताचा हा प्रमुख उपक्रम आहे.

5. बिश्केक घोषणापत्रासोबतच हवामान, आण्विक सुरक्षा, ऊर्जा संवर्धन आणि अमली पदार्थांच्या व्यसनाविरुद्धच्या लढ्यासह विविध क्षेत्रांशी संबंधित चार सामंजस्य करार तसेच वीस हून अधिक निर्णय आणि निवेदने शिखर परिषदेत स्वीकारण्यात आली.

6. बिश्केक घोषणापत्रात समाविष्ट असलेल्या अनेक उपक्रमांचे नेतृत्व भारताने केले असून त्यांना भारताने पाठिंबा दिला आहे. यामध्ये SCO च्या चार्टर मध्ये इंग्रजीचा अधिकृत भाषा म्हणून समावेश; सिव्हिलायझेशन डायलॉग फोरम; यंग सायंटिस्ट फोरम; आणि यंग ऑथर्स कॉन्क्लेव्ह या उपक्रमांचा समावेश आहे.

7. शिखर परिषदेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल पंतप्रधानांनी राष्ट्रपती माननीय श्री. सादिर झापारोव्ह यांचे आभार मानले. सामायिक प्रगती आणि समृद्धीसाठी SCO परिवारासोबत काम करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचा त्यांनी पुनरुच्चार केला. पंतप्रधानांचे संपूर्ण भाषण येथे पाहता येईल. (लिंक)

बिश्केक

01 सप्टेंबर 2026